'मनोगत'

आज मी सत्तरीच्या उंबरठ्यावर उभा असून, आपण सर्वार्थाने सुखी-समाधानी व समृध्द जीवन जगत आहोत म्हणून स्वतःला भाग्यवान समजतोय जिवनांत घडलेल्या संस्कारांच्या आधारें कधींच कुठल्याही प्रकारें तोल सुटूं न दिल्यामुळें (भ्रष्टाचार, प्रलोभनें, मिळालेल्या अधिकाराचा गैरवापर, व्यसनाधिनता, हेवे-दावें, वैर, सूड (आकस) इ. इ.च्या आहारी न गेल्यामुळें) आज मी, "नाही पुण्याची मोजणी - नाही पापाची टोचणी" असें जीवन अनुभवत आहे व त्यामुळें भरपूर सुख व समाधान लाभत आहे.

सुख-समाधान मानणें हे आपल्या मनोवृत्तीवर अवलंबून असतें. बालपणापासून आपल्या मनावर घडत असलेल्या संस्कारातूनच आपली मनोवृत्ती साकारते-विकसित होते व आपले जिवन समृध्द करते असें मी मानतो. हे संस्कार बालवयांत घरांतील कौटुम्बिक वातावरणामुळेंच घडतात. नंतर अगदीं प्राथमिक शाळेपासून - महाविद्यालयांतील विविध स्तरावर भेटलेल्या गुरुजनांच्या शिकवणीतून तसेंच मित्र-मैत्रिणींच्या सहवासातूनसुध्दां घडतात व जिवन समृध्द करण्यास मदत करतात असें म्हणणे उचित ठरेल. ह्या संस्कारांचा जसेंच विशेश घटनांचा पगडा आपल्या दैनंदिन जिवनांत कायमस्वरुपांत छाप मांडून असतो. हा नुसता विचार अथवा कल्पना-विलास नसून वास्तवता - वस्तुस्थितीतून प्राप्त आलेला "सिध्दांत" आहे म्हणणेच उचित ठरेल.

कला शिक्षण क्षेत्रांत अधिव्याख्याता, प्राध्यापक, अधिष्ठाता अशा विविध स्तरांवरील पदांवर निष्ठापूर्वक मनोभावे ३५ वर्षे कार्यरत राहून, नांवलौकिक मिळविले. पण सर्व श्रेय मी कधींच माझ्या एकट्याचे मानले नाहीं; तसेंच सध्या मिळत असलेले सुख-समाधानही माझ्या एकट्यामुळेंच प्राप्त आलेय असाही माझा दावा नाही. इतरांच्या सहवासांतून व लहानपणापासून घडलेल्या संस्कारातून जी मानसिक परिपक्वता बुध्दिंगत आली त्याचीच ही फलश्रुती आहे असें मी मानतो. हे संस्कार घडविणारे माझे माता-पिता, बंधू-भगिनी, आप्तेष्ठ, मित्र-मैत्रिणी व आदरणीय गुरुजन ह्यांचाही त्यांत फार मोठा सहभाग असून, मी तो फार महत्त्वाचा मानतो - समजतो.

आमच्या बालपणीं 'एकत्र-कुटुम्ब' पध्दती मोठ्या प्रमाणांत प्रचलित होती. व समाजांत तिला अनन्यसाधारण स्थानही होतें. त्या काळांत कुटुम्बेही मोठी असत. आमचाही कुटुम्ब परिवार बराच मोठा होता. त्यामुळें चुलत, मावस, आत्ये, मामे बहिण भावंडे व इतर आप्तेष्ठ वरचेवर एकत्र जमत असूं. तसेंच कारणपरत्वें एकत्र रहातही

असं. त्यातूनच घरांत "सहकार्य-भावना, खेळकर वृत्ती, बांधिलकीची भावना, त्यागवृत्ती, येणाऱ्या-जाणाऱ्या बद्दल आस्था, जिव्हाळा, वडिलधाऱ्यां बद्दल आदर, अतिथींचे आदरातिथ्य, निस्वार्थीपणा अशा स्वरूपाचे नानाविध संस्कार कळत न कळत बाल वयांतच घडले व आजही ते मूळ धरून आहेत. त्या सोबतच घराबाहेर देखिल "बालवीर संघटना", "राष्ट्रीय स्वयंसेवक संघ", "रामदास क्लब" (देशी खेळांचे क्रिडामंडळ) - अशा विविध संस्थांमुळे - स्वावलंबन, सेवावृत्ती, राष्ट्रीयत्व, एक संघ खिलाडू वृत्ती, प्रामाणिकपणा, सचोटी, जिद्द, कर्तव्य निष्ठा, समंजसपणा असें सर्वांगीण व्यक्ति विकासास आवश्यक असे जे संस्कार लाभले ते कायमचे अंगवळणी पडलेत. तेथील मार्गदर्शकांचा आपल्या व्यक्ति विकासांत सिंहाचा वाटा आहे असें मी समजते व त्या सर्वांनाही मी आजसुध्दां गुरु स्थानी मानते.

ज्या शिक्षकांच्या बोलण्या-वागण्यांतून, शिकविण्याच्या विशिष्ट पध्दतीतून, दैनंदिन संपर्कातून जे संस्कार घडलेत ते आजही त्या गुरुजनांची पदोपदीं आठवण करून देतात. त्यांच्या आठवणी तर कधींकधीं अक्षरश: भारावून टाकतांत. प्राथमिक शाळेतील उंचपुरें, पांढरे शुभ्र स्वच्छ कपडे परिधान केलेले "भिंगे-गुरुजी" आजही डोळ्यासमोर दिसतात. पंच तंत्र व ईसापनितीतील कथा सांगतांना कथेच्या तात्पर्यावर भर देवून ते बालमनावर ठसविण्याची त्यांची लकब आगळी वेगळीच असें. पाढे, उजळणी, मनाचे श्लोक व इतर बाल-वाङ्मय ते ज्या पध्दतीनें, तन्मयतेने शिकवित त्याची सर इतर शिक्षकांच्या शिकविण्यांत क्वचितच आढळे. आजही बालपणींचे आपण त्या कथा वर्गात बसून तन्मयतेनें ऐकत आहोत असें दृष्य डोळ्यासमोर उभें रहाते. ईसापनितीतील कथां द्वारें घडलेले बालवयांतील ते संस्कार आजही टिकून आहेत. ही किमया अतुलनीय आहे असें मला वाटते.

त्या पुढील शालेय जिवनांत अकोला येथील तेव्हांच्या गव्हर्नमेंट हायस्कूलमधे (हल्लीचे शा. आगरकर हायस्कूल) शिकत असतांना जे बहुविध संस्कार घडले त्यांचा ठसा आजही माझ्या मनावर कायम आहे.

माझ्या जीवनाला तसेंच जीवनांत आवश्यक असलेल्या मानसिक परिपक्वतेला समृध्द करण्यांत सिंहाचा वाटा - त्याच शाळेतील - गुरुवर्य विष्णू अमृत - उपाख्य "काका" टोंबरे ह्यांचाच आहे. ते आम्हाला इंग्रजी व भूगोल विषय शिकवित असत.

घराच्या जवळ पासच रहात असल्यामुळें माझें त्यांच्याकडे बरेंच जाणे येणे होते. शिकविता शिकविता विषयाचे अनुषंगानेच जिवन विषयक तत्वज्ञानही कांहीं उद्‌बोधक उक्त्या अथवा बोधपर वचनाद्वारें सांगत असत. त्यांतील कांहीं विचार आजही बहुमोल वाटतात. उदा.-

"आपण आपली तुलना आपल्यापेक्षां श्रीमंतांशी कधीच करूं नये कारण तसें केल्यास आपण सदैव गरीबच राहूं. उलट आपल्यापेक्षां गरीबांशी आपण आपली तुलना केली तर आपण सदैव श्रीमंतच राहूं" त्यांतच खरें 'सुख व समाधान' जाणवेल. तसेंच -

"आयुष्यांत नुसते मोठेपणाला महत्त्व नसून आपण ते मोठेपण कशारितीने प्राप्त केलंय त्यालाच खरें महत्त्व आहे"

भूगोल शिकवितांना देखिल ते एखाद्या प्रदेशाचे अथवा देशाचे वर्णन देखिल अशा विशिष्ट शैलींत करित असत कीं - आपल्याला वाटावे कीं आपण प्रत्यक्षांत तिथेंच आहोत. वायव्य सरहद्द प्रांताचा भूगोल शिकवितांना तेथील लोक व हवामानाच्या विषय लिपतांच त्यांनी काय विचार मांडवा ? - "अहो! तुम्हाला माहित आहे! तिथें इतकी कडाक्याची थंडी पडते कीं माणूस गारठून जाईल. पण लक्षांत असूं द्या - आपण जेव्हां इकडे थंडीच्या दिवसांत रजईच्या ऊबेत निर्धास्तपणें गाढ झोपलेलो असतो तेव्हां आपल्या सारख्यांच विविध प्रांतातील शूर-सैनिक तिकडील थंडी-वाऱ्याची तमा न बाळगतां व प्राणाची पर्वा न करतां रात्रीच्या अंधःकारांत डोळ्यांत तेल घालून जागृत पहारा करीत असतांत - काय समजलांत! असें असते राष्ट्र-प्रेम. त्यांना कधीही विसरूं नका." कदाचित उद्यां तुमच्या पैकीही कुणी तरी तिथें असेल - नाही कां! शिकवतां शिकवितां असेले उदात्त विचार मांडणारे आमचे तेच एकमेव गुरुजी होते. असें शिक्षक आम्हाला लाभले - आम्ही म्हणूनच खरें भाग्यवंत.

"१९४० साल" - त्यासाली मी नवव्या वर्गात शिकत होतो तर माझा थोरला भाऊ - 'अण्णा' (LK) अकराव्या वर्गात (तेव्हांचे मॅट्रिक) शिकत होता. त्यांचे वर्ग शिक्षक होते काका डोंबरे. शालेय जिवनांतील अखेरचे वर्ष म्हणून त्या वर्गाने अकोल्याच्या मोर्णा नदीच्या किनाऱ्यावर "आनेकर" वर "कोजागिरी" साजरी करावयाचे ठरविले व "काकांना" समारंभ पूर्वक निरोप देण्याचा घाट घातला. त्यांनीही आपला सहभाग दिला. व निरोप घेतांना ते आपल्या भाषणांत म्हणाले -"आतां परिक्षा संपतांच कोण कुठें जाईल सांगता येत नाही. वेग वेगळ्या दिशांनी तुमची मार्ग-क्रमाण चालूं राहील. आजपासून

बरोबर २० वर्षांनी अशीच कोजागिरी पुन्हां इथेंच घडवा. बघूं या तर ~~खरी~~ खरं! त्यावेळीं तुमच्यापैकी कोण काय झाला असेल व कुठें असेल. मी मात्र इथेंच ~~इथेंच~~ सेवा-निवृत्त शिक्षक म्हणून तुमची वाट पहात असेन." माझा भाऊ पुढें सैन्यांत दाखल होवून - संयुक्त राष्ट्र संघाच्या शांती सेनेत 'मेजर'च्या हुद्यावर पोहोचला होता. पण १९५८ सालींच त्याचे "गाझा स्ट्रीप" वर असतांना - ~~त्याचे~~ अपघाती निधन झाले (अपघाती). १९५९-६० सालीं मी अमेरिकेंत उच्चशिक्षणासाठी लॉस एन्जेल्सला गेलो होतो. अण्णा ह्यांत असतां तर पत्र रुपानें कां होईना १९६०-च्या (२० वर्षांनंतर) कोजागिरीला "काकां"ना भेटला असतां ह्याची मला जाणीव होती. म्हणून - अर्थाअर्थी माझा कांहीं संबंध नसतांना मी त्यांना पत्र पाठवून घडला प्रकार कळविला व माझ्या तर्फे शुभ-कामना पाठविल्या. '१९६०'ची कोजागिरी अमरावतीच्या डॉ. बेंद्रे यांनी (माझ्या भावाचे निकट-मित्र) पुढाकार घेवून अकोल्याला त्यांच ठीकाणी आयोजित करून साजरी केली. निधन पावलेले व परदेशांतील कांहीं व्यक्ति वगळतां १५-२० जण त्यांच ठिकाणीं जमले होते. कुणीं ख्यातनाम डॉक्टर तर कुणी इंजीनिअर, तर कुणी सधन व्यापारी असा तो मेळावा आटपल्याचे कोजागिरी नंतर १०-१५ दिवसांनी मला काकांचे अमेरिकेंत पत्र आले. त्यांत त्यांनी "आज माझें अंतःकरण भरून येत आहे. २० वर्षांपूर्वी मी एक साधी इच्छा व्यक्त काय केली आणि आज २० वर्षांनंतर माझे विद्यार्थ्यांनी ती पूर्ण केली - खरोखरच मी स्वतःला भाग्यवान समजतो." त्यांनी घडविलेली ही इच्छापूर्ती मी आयुष्यांतील फार मोठी घटना व कमाई समजतो. भारतात परत आल्यावर मला जरूर भेट. लॉस एन्जेल्सचे वर्णन मला प्रत्यक्ष तुझ्या तोंडून ऐकावयाचे आहे. L.K.चे व्यक्तिमत्त्व वाखाणण्या सारखे होते. तुझेंही यश कौतुकास्पद आहे". भारतांत परत आल्यावर मी त्यांची दुसरी इच्छाही पूर्ण केली. त्यांचे ते पत्र अद्यापही जपून ठेवले आहे. त्यांत देखिल इतर मजकुराबरोबर थोर व्यक्तिंची काहीं बोधपर वचनें उद्धृत केली आहेत.

पुढें महाविद्यालयीन जीवनांत देखिल - सर. जे. जे. स्कूल ऑफ आर्ट, मुंबई येथें शिकत असतांना, उमदे व्यक्तिमत्त्व असलेले एक निष्णात प्रशासक व प्रेमळ शिक्षक आयुष्यांत मला प्रथमच भेटले. त्यांची रहाणी, बोलण्या-चालण्याची ढब, सहकारी व विद्यार्थी ह्यांच्या गुणावगुणांची पारख करून अंगच्या गुणांची प्रशंसा करून त्यांना प्रोत्साहन देण्याची प्रवृत्ती सर्व कांहीं संस्मरणीयच! संस्थेच्या

नांव लौकिक वाढविण्याची त्यांची जिद्द, त्यासाठीं योजिलेल्या नव नविन योजना व केलेले अथक प्रयत्न वाखाणण्यासारखें होते. कळत न कळत त्यामुळेंही ~~असें संस्कार~~ जें बरेंच संस्कार घडले त्याची प्रचिती पुढें मला जाणविली. १९७१ साली जेव्हां औरंगाबाद येथील शासकिय कला महाविद्यालयाच्या नव निर्मितीची (संस्थापनाची) जबाबदारी मी पत्करली, तेव्हां ती पांच वर्षे, ते तर माझी अदृश्य प्रेरणा शक्तिच होते. कॉलेज सोडल्या पासून आजही आमचे ~~आमचे~~ कौटुम्बिक जिव्हाळ्याचे संबध टिकून आहेत. अधून मधून आमचे मतभेदही होत असत पण अखेरीस समझोतेही होत असत हेहि तितकेंच खरें. कांहीं काळ त्यांच्या हाता खाली काम करण्याचाही योग जुळून आला होता. अशी ही व्यक्ति म्हणजे कॉलेजांत शिकत असतांना आम्ही सर्वजण (विद्यार्थी व शिक्षक) ज्यांना "दादा" च म्हणत असूं असें आमचे गुरुवर्य प्रा. वि. ना. आडारकर, जें आतां ८६ व्या वर्षात पदार्पण करतील. त्यांना कधीं 'सर' म्हटल्याचे मला आठवतच नाही. दादांच्या बरोबरच आणखी एक तरुण व उमदे व्यक्तिमत्त्व त्यांच संस्थेत मला त्या काळांत प्रेरणा स्थान म्हणून लाभले. ते म्हणजे प्रा. प्र. दा. अभ्यंकर. स्कूल ऑफ आर्ट मधें शिकतानाचे काळांत माझें खरें मार्गदर्शक, मदतकर्ते व प्रेरणा स्थान तेच होते म्हटल्यास अतिशयोक्तिचे ठरणार नाही. त्या काळच्या मुंबईच्या 'निवास' अडचणींच्या प्रसंगी मला निवारा देणारी हीच अेकमेव व्यक्ति. त्यांची वेळीच मदत मिळाली नसती तर माझ्या आयुष्याला वेगळीच कलाटणी मिळाली असती. त्यांच्याच मार्ग दर्शन मुळें व प्रोत्साहनामुळें स्कूल ऑफ आर्ट मधील चारही परिक्षा गुणवत्ता यादींतील गुणानुक्रमांनी पास झालो. तसेंच प्रदर्शनांत व स्पर्धांतही बक्षिसे व शिष्यवृत्ती प्राप्त करूं शकलो. कांहीं काळ त्यांच्या त्यांच्या सह रहाण्याचा योगही (अधून मधून) घडला. व आमच्यांत कायमची जवळीक निर्माण झाली. पुढें कांहीं वर्षांनी स्कूल ऑफ आर्ट सोडून ते दिल्लीस गेले. तरीसुध्दा अधून मधून भेटी व पत्रां द्वारें आम्ही संपर्क साधून ~~साधून~~ होतो. आतां ते सेवा निवृत्त झाले असून त्यांचे वास्तव्य कांहीं काळ इथें पुण्यांत व कांहीं काळ दिल्लीला (मुलगा तिथें असतो) असतें. त्यांच्या कुटुम्बियांशीही आमची जवळीक घडली ~~व ती अजूनही टिकून आहे~~. व त्यातून जिव्हाळ्याचे नातें निर्माण झाली असून भावी पिढींतही सलोखा निर्माण झालाय. ~~सध्या~~ हल्ली तर मी त्यांचेकडे एक निकटवर्तीय वडिलधारें नातेवाईक, जिव्हाळ्याचे एक मित्र व आदर्शवत आदरणीय गुरू ह्या तिहेरी दृष्टीकोनांतून ~~बघत असतो~~ बघत असतो. १० जून १९९३ रोजीं आमच्या

"प्रथम भेटीला" भेटीला ५० वर्षे पूर्ण झालीत. त्या निमित्ताने मी त्यांना सपत्नीक घरी बोलावले असतां ते नुसतेच आले नाही तर येतांना बरोबर पेढेही घेऊन आले व ऋणानुबंधातून घडलेल्या आमच्या जिव्हाळ्याच्या गोडव्यांत भर घालुन गेले.

त्यावेळीं त्यांच्या पत्नी, सौ. सुशीलाताई म्हणाल्या - "अप्पा! असें हे गुरुशिष्य मानणारे व टिकवणारे "गुरु-शिष्य" हल्ली क्वचितच आढळतात, नाही का!" त्यांचे कडे पाहून मी नुसतांच हसलो. पण मनांतल्या मनांत म्हणत होतो - "ह्यालाही भाग्य लागते. म्हणजेच तुम्ही-आम्ही भाग्यवान! दुसरें काय?" माझेही कांहीं विद्यार्थी दरवर्षी "दसऱ्याचे दिवशीं घरीं येवून आदर व्यक्त करुन जातात. हे हेंच ते खरें 'सुखी-समाधानी, ~~[illegible]~~" समृध्द आयुष्य", संस्कारांनी घडविलेले, संस्कारांनी फुलविलेले.

ज्यांच्या सहवासांतून हे संस्कार घडले व असे "सुखी समाधानी व समृध्द आयुष्य" लाभले त्या माझ्या आदरणीय "माता-पित्यांना" - "आप्तेष्टांना" व "गुरुजनांना" व असें हे सर्व योग घडवून आणणाऱ्या विधात्याला - 'त्रिवार वंदन' - 'त्रिवार वंदन' - 'त्रिवार वंदन'

गो. कृ. उपाख्य अप्पा देशपांडे.

२ भाग्यश्री,
पुणे. ३८.
दि. २६ सप्टेंबर १९९३.